वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि.१२ डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# बीडमधील कोळवाडीजवळ थरार!

# भरधाव डिझेल टँकरने रस्त्यावर घेतला पेट





Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com
दिव्य वार्ता



बीड (दिव्य न्युज):- बीड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पालीजवळ असलेल्या कोळवाडी गावाजवळ शुक्रवारी (दि. १२) सायंकाळी ५.१५ च्या सुमारास डिझेलच्या टँकरने अचानक पेट घेतल्याची थरारक घटना घडली आहे. भर रस्त्यावर वेगात असलेल्या या टँकरने आग घेतल्यामुळे परिसर हादरला आणि स्फोटाच्या भीतीने नागरिकांमध्ये मोठी दहशत निर्माण झाली होती.पेट्रोल पंपासाठी डिझेल घेऊन जाणारे हे टँकर कोळवाडीजवळ आल्यानंतर अज्ञात कारणांमुळे पेटले. भररस्त्यावर धावत्या टँकरने आग घेतल्यामुळे मोठी खळबळ उडाली. टँकरमध्ये डिझेलचा मोठा साठा असल्याने आग प्रचंड वेगाने वाढली. डिझेलमुळे टँकर अक्षरशः जळून खाक झाला आणि परिसरात स्फोट होण्याची भीती होती. या भीषण आगीमुळे रस्त्यालगतची झाडेही पेटली, ज्यामुळे परिसरात धुराचे आणि आगीचे मोठे लोट पसरले होते.

घटनेची माहिती मिळताच ग्रामीण पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम सुरू केले. सुदैवाने या भीषण आगीत कोणतीही जीवितहानी झाली आहे का, याबाबतची माहिती अजून समोर आलेली नाही. पोलीस पुढील तपास करत आहेत.

## 'अमर रहे' घोषणांनी गोपीनाथ गड दुमदुमला!

# लोकनेते मुंडेंच्या जयंतीनिमित्त जनसागर



परळी , (दिव्य न्युज):- महाराष्ट्राचे लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त आज (१२ डिसेंबर) परळी तालुक्यातील पांगरी येथील गोपीनाथ गड 'अमर रहे... अमर रहे... गोपीनाथराव मुंडे अमर रहे...' या घोषणांनी दुमदुमून गेला. राज्यभरातून हजारो चाहते सकाळपासूनच गोपीनाथ गडावर दाखल झाले आणि आपल्या लाडक्या नेत्याच्या समाधीस्थळाचे दर्शन घेत त्यांनी विनम्र अभिवादन केले. संपूर्ण परिसर मुंडेसाहेबांच्या स्मृतीने भारलेला होता.

गडावर मुंडे कुटुंबाची उपस्थिती यावेळी राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, माजी कृषिमंत्री व परळीचे आमदार धनंजय मुंडे, बीडच्या माजी खासदार प्रीतम मुंडे आणि प्रज्ञा गोपीनाथराव मुंडे यांनी एकत्र येत समाधीस्थळाचे दर्शन घेतले आणि भजन कार्यक्रमात सहभाग नोंदवला. यावेळी माजी मंत्री बदामराव पंडित, बाळराजे पवार यांसह अनेक मान्यवर आणि मुंडेप्रेमींची गर्दी होती.

▶▶ पान २ वर

## केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत सर्वात मोठा निर्णय

# २०२७ मध्ये देशभरात २ टप्प्यात जनगणना होणार



नवी दिल्ली (वृत्तसेवा):- केंद्रीय मंत्रिमंडळात आज मोठा निर्णय घेण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज केंद्रीय कॅबिनेट बैठक पार पडली. या बैठकीत गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जनगणनेबाबत निर्णय घेण्यात आला. गेल्या अनेक वर्षांपासून जनगणना प्रलंबित आहे. त्यामुळे विरोधकांकडून सातत्याने जनगणना व्हावी आणि ती जातनिहाय व्हावी, अशी मागणी केली जात होती. अखेर विरोधकांची ही मागणी मान्य झाली आहे. देशभरात आता जनगणना होणार आहे.२०२७ मध्ये देशभरात दोन टप्प्यात जनगणना होणार असल्याची माहिती आता समोर आली आहे.

▶▶ पान २ वर

# सहावीत शिकणाऱ्या मुलीवर अत्याचार

## भीतीपोटी बापाने तिचे शिक्षणच केले बंद



बीड , (दिव्य न्युज):- नाशिकमधील मालेगाव, बीड तालुक्यातील शिरूरच्या घटना ताज्या असतानाच, आता बीडमध्येही सहावीच्या वर्गात शिकणाऱ्या मुलीवर बलात्कार झाला. या प्रकरणात आरोपीलाही लगेच अटक झाली, परंतु मुलगी असुरक्षित असल्याची भावना ठेवत पालकांनी तिचे शिक्षणच बंद केले आहे. विशेष म्हणजे, तिच्या जबाबाला १४ दिवस उलटूनही तिला बालकल्याण समितीसमोर हजर केले नव्हते. जर वेळीच हजर केले असते तर हा प्रकार समुपदेशनाने थांबवता आला असता, असे तज्ज्ञांचे मत आहे.

५ नोव्हेंबर रोजी पीडितेची आई कामासाठी गेली असताना मुलगी खेळत होती. परत आल्यावर ती गायब दिसल्याने आईने शिवाजीनगर पोलिस ठाणे गाठून अपहरणाचा गुन्हा दाखल केला; परंतु नंतर मुलीने आपण मामाकडे गेल्याचे सांगितल्याने हा गुन्हा निकाली काढला जात होता. त्याच्या मंजुरीसाठी २२ नोव्हेंबर रोजी पत्रही पाठवले होते; परंतु अचानक यात नवा ट्विस्ट आला. २६ नोव्हेंबर रोजी मुलीने थेट पोलिस अधीक्षक कार्यालय गाठून बलात्कार झाल्याचे सांगितले. त्यानंतर तिचा जबाब घेण्यात आला. यात तिने ओळखीच्याच

▶▶ पान २ वर

### तपास योग्य पद्धतीने

गुन्ह्याचा तपास योग्य पद्धतीने सुरू आहे. तक्रारदाराला पूर्ण माहिती दिली जाईल. २४ तासांत बालकल्याण समितीसमोर हजर करावेच, असे बंधन नाही. आम्ही न्याय देण्याच्या भूमिकेत आहोत.

**– पूजा पवार, उपअधीक्षक, बीड**

### पोलिसांना पत्र देऊ

अत्याचार असो की इतर कोणत्याही प्रकरणातील पीडितेला पोलिसांनी २४ तासांत आमच्यासमोर हजर करणे आवश्यक आहे. काळजी व संरक्षणाच्या अनुषंगाने हे गरजेचे आहे. यात पोलिसांना पत्र देणार आहोत.

**–अशोक तांगडे, अध्यक्ष, बालकल्याण समिती, बीड**




# प्रायव्हेट विमानामधील 'त्या' सेल्फीमुळे भाजप नेते गोत्यात

## अमित शहांनी सुनावलं





मुंबई, (दिव्य न्युज):- इंडिगो संकटामुळे देशभरात हजारो प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला. इंडिगोनं गेल्या १० दिवसांत शेकडो विमानांची उड्डाणं रद्द केली. त्यामुळे देशभरातील विमानतळांवर प्रचंड गर्दी उसळली. अनेक प्रवासी कित्येक तास विमानतळावर अडकून पडले. देशातील सर्वसामान्य जनतेचे हाल सुरु असताना भाजप चे नेते मात्र चार्टर्ड विमानानं प्रवास करत होते. त्या प्रवासाचे फोटो त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट केले. सामान्य जनता त्रासात असताना नेत्यांनी केलेला आरामदायक प्रवास चर्चेचा विषय ठरला. चार्टर्ड प्लेननं प्रवास करणाऱ्या नेत्यांची भाजप नेतृत्त्वानं चांगलीच कानउघाडणी केली आहे.

गेल्या आठवड्यात इंडिगो संकटामुळे देशभरातील विमानतळांवर एकच हलकल्लोळ उडाला. हजारो प्रवासी रखडले. कित्येक तास त्यांना विमानतळावरच काढावे लागले. याच सुमारास भाजपचे विधान परिषदेतील गटनेते प्रवीण दरेकर, विधान परिषदेचे आमदार प्रसाद लाड , चित्रा वाघ यांनी चार्टर्ड फ्लाईटनं नागपूर गाठलं. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनासाठी नागपुरला

▶▶ पान २ वर

# तिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी लांडगे कुटुंबीयांचे अनेक दिवसांपासून आमरण उपोषण




केज, (दिव्य न्युज):- न्यायालयाचा अंतिम हुकूमनामा झालेला असतानाही अतिक्रमण हटविण्याची कारवाई झालेली नाही. मोजणीस पोलिस संरक्षण न दिल्याने भुखंड ताब्यात मिळत नसल्याने केज येथील लांडगे कुटुंबीय मुला बाळांसाह केज तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसले आहेत. या बाबतची माहिती अशी की, केज येथील विष्णू श्रीमंत लांडगे यांच्यासह त्यांच्या पाच

▶▶ पान २ वर

# 'स्व.गोपीनाथराव मुंडे' शेठजी-भटजींच्या भाजपला 'माधव' पर्यंत पोहोचवणारा नेता

गोपीनाथ मुंडे यांचा आज (१२ डिसेंबर) जन्मदिन. त्या निमित्ताने गोपीनाथ मुंडेंची एकूण राजकीय कारकीर्द नेमकी कशी होती याचा आढावा घेणारा हा लेख पुन्हा प्रसिद्ध करत आहोत.कारमधून उतरताच रुबाबानं जाकीट झटकणं, खिशातून कंगवा काढून भांग पाडणं, बोलताना मिशीवरुन ताव मारणं नि बोलणं झालं की मोबाईलचा फ्लॅप



बंद करुन शेजारच्या कार्यकर्त्याकडं फेकणं...
स्टाईलमध्ये वावरणारा नेता अशी एक ओळख ते भाजप पक्षाच्या वाढीसाठी महाराष्ट्राची जमीन नांगरणारा लोकनेता अशी महत्त्वपूर्ण ओळख असलेल्या दिवंगत गोपीनाथ मुंडे यांचे ३ जून २०१४ रोजी दिल्लीमध्ये अपघाती निधन झाले.ज्या काळात राज्यात कॉंग्रेसचं आणि त्यातही बहुतकरुन मराठा जातीच्या नेत्यांचं राजकारणावर वर्चस्व होतं, अशा काळात गोपीनाथ मुंडे यांनी राज्यातील ओबीसी जातींची मोट बांधली. 'शेठजी-भटजींचा पक्ष' अशी ओळख असलेल्या भाजपला उच्चवर्णीय जातींच्या पल्याड नेण्यात त्यांनी यश मिळवलं.

प्रमोद महाजन यांना वगळून गोपीनाथ मुंडे यांच्या राजकीय कारकिर्दीचा विचार करताच येत नाही. बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील नाथ्रा या अत्यंत छोट्या गावातील वंजारी या राजकीय प्रतिनिधित्वापासून वंचित असलेल्या समाजामधून आलेल्या गोपीनाथ मुंडे यांना सामाजिक-राजकीय क्षेत्रात आणलं ते प्रमोद महाजन यांनीच.घरात वारकरी परंपरा आणि भगवान गडाचे महंत भगवानबाबा गडकर यांचा अध्यात्मिक प्रभाव असलेल्या कुटुंबातून आलेले गोपीनाथ मुंडे उच्च शिक्षणासाठी पुण्यात दाखल झाले आणि प्रमोद महाजनांसोबतच्या मैत्रीमुळे त्यांचं आयुष्य पूर्णपणे पालटून गेलं.घरातून कसलाच राजकीय वारसा नसताना केवळ कॉलेजमधील या मित्राचं बोट पकडूनच ते संघ विचारांच्या जवळ आले. त्यानंतर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून विद्यार्थी राजकारण आणि नंतर पर्यायाने संघाच्या राजकीय फळीचे म्हणजेच भाजपचे आघाडीचे नेते बनले.प्रमोद महाजन आणि गोपीनाथ मुंडे यांची केवळ मैत्री न राहता पुढे नात्यातही रूपांतर झालं. प्रमोद महाजन यांच्या बहिणीसोबतच गोपीनाथ मुंडे यांचा पुढे प्रेमविवाह झाला. खऱ्या अर्थाने १९७० सालापासून गोपीनाथ मुंडे यांच्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात झाली. आणीबाणीविरोधातील आंदोलनात मुंडे-महाजन ही जोडी जनसंघाचे तरुण शिलेदार म्हणून मराठवाड्यात आघाडीवर होती.'शेतकरी कुटुंबातून वरती आलेला, ग्रामीण भागाची नस न् नस माहीत असलेला नेता' असं गोपीनाथ मुंडेंचं वर्णन ज्येष्ठ पत्रकार जयदेव डोळे करतात.त्यांनी बीबीसी मराठीशी बोलताना सांगितलं की, गोपीनाथ मुंडे नामांतर आंदोलनातही सहभागी होते. आणीबाणीमध्ये तुरुंगात गेल्यामुळे हिंदुत्ववादी विचारसरणीच्या पलीकडेही तेवढेच त्यागी कार्यकर्ते असतात, याची त्यांना जाणीव झाली. त्यामुळे, गोपीनाथ मुंडे कधीच इतर हिंदुत्ववादी राजकारण्यांसारखे कडवट नव्हते. त्यांची लोकप्रियता सर्व समाजांमध्ये वाढण्यामागचं कारणही हेच होतं. सर्व जातींना ते आपलेसे वाटत होते. ते कधीच 'हिंदुराष्ट्र-ब्राह्मण्य' अशा भाषेत बोलत नव्हते.विकास आणि लोकांची कामे करत राहणं हाच त्यांच्या राजकारणाचा भाग होता. त्यामुळे, ते लोकप्रिय तर झालेच झाले; पण ते खरोखरचे 'मास लीडर'ही झाले. लोकांना पुरेपूर वेळ देणारा, खूप प्रश्नांची जाण असणारा, भाषेवर प्रभुत्व असणारा नेताच मास लीडर होऊ शकतो. हे सगळे गुण त्यांच्यात होते. आंदोलने करुन, लाठ्या खाऊन, तुरुंगात जाऊन त्यांचं नेतृत्व उभं राहिलं होतं, असं डोळे सांगतात.

बीडचे ज्येष्ठ पत्रकार आणि 'सकाळ'चे माजी सहसंपादक अशोक देशमुख यांनी बीबीसी मराठीशी बोलताना सांगितलं की, महाराष्ट्राची जमीन नांगरुन शिवसेनेसोबतच्या युतीच्या माध्यमातून भाजपसाठी सत्तेचा सोपान सोपा करण्यासाठी ते झटले. आज त्याचीच फळे महाराष्ट्रातील भाजप उपभोगतो आहे, असं म्हटल्यास वावगं ठरू नये.भाऊ प्रवीण महाजन यांनी गोळ्या घातल्यानंतर रक्तबंबाळ झालेल्या प्रमोद महाजन यांना गोपीनाथ मुंडे यांनीच दवाखान्यात नेलं होतं. थोडक्यात, अगदी कॉलेजपासून ते अगदी शेवटच्या क्षणापर्यंत ही जोडी सोबतच होती.स्थापनेपासूनच 'शेठजी-भटजीं'चा म्हणजेच तथाकथित वरच्या जातींचा पक्ष अशी ओळख असलेल्या भाजपाने १९८० च्या दशकात आपला चेहरा-मोहरा बदलायला सुरुवात केली होती.जनसंघाचे नेते वसंतराव भागवत हेच यासाठी राबवलेल्या 'माधव' अर्थात 'माळी-धनगर-वंजारी' फॉर्म्युल्याचे प्रवर्तक होते. माळी समाजामधून ना. स. फरांदे, धनगर समाजामधून अण्णा डांगे आणि वंजारी समाजातून गोपीनाथ मुंडे यांना राज्याच्या राजकीय पटलावर नेता म्हणून पुढे आणलं गेलं.दौऱ्यावर गेल्यावर कधीही हॉटेलमध्ये न उतरता, एखाद्या सामान्य कार्यकर्त्याच्याच घरी मुक्काम करायचा, अशा स्वरूपाची शिकवणही वसंतराव भागवत यांनीच गोपीनाथ मुंडे यांना दिल्याचं सांगितलं जातं.लोकसंपर्क कसा वाढवावा, जनतेचे प्रश्न कसे हाताळावे, बेरजेचं राजकारण कसं करावं इथपासून ते भाषण कसं करावं इथपर्यंतचे राजकीय बाळकडू भागवतांनीच दिल्याचं स्वत: गोपीनाथ मुंडे सांगायचे.पुढील काळात वसंतराव भागवतांचा 'माधव प्रयोग' गोपीनाथ मुंडे यांनी पुढे नेला. साळी, माळी, धनगर, वंजारी, दलित, मराठा अशा अनेक जातीजमातींचे कार्यकर्ते आणि नेते भाजपकडे आकर्षित करण्याचा सोशल इंजिनिअरिंगचा प्रयोगही त्यांनी यशस्वी केला.याबाबत बोलताना जयदेव डोळे सांगतात की, १९८९ साली मंडल आयोग स्वीकारला गेला; तेव्हापासून मुंडेंचं नेतृत्व अधिक विस्तृत होत गेलं. उघडपणे आणि अधिकृतपणे त्यांना मागासलेल्या जातींचं राजकारण करता आलं. तोपर्यंत मागासलेल्या जाती म्हणजे दलित जाती असंच मानलं जायचं. पण ज्या मध्यम जाती म्हटल्या जातात, त्या जातींचं नेतृत्व मंडल आयोगामुळे विस्तारलं गेलं आणि त्याचा मुंडे यांनी भरपूर फायदा घेतला.

तसेच, त्यांनी स्वत: आंतरजातीय विवाह केला होता. त्यांची बायको ब्राह्मण जातीची म्हणजेच प्रमोद महाजनांची बहिण होती, हा मुद्दादेखील ते अधोरेखित करतात. गोपीनाथ मुंडे हा बेरजेचं राजकारण करणारा नेता होता. त्यांचं राजकारणात कुणीही कायमस्वरुपी शत्रू नव्हतं. भाजपमध्ये असतानाही त्यांना मुस्लीम मतदारांचा मोठा पाठिंबा होता. त्यांच्यामुळेच भाजपमध्ये विविध जातींचे नेते आले. त्यांना भलेही ओबीसी वा वंजारी नेता म्हणवलं जात असलं तरीही ते सर्वव्यापी असे नेते होते.आज महाराष्ट्रातील ग्रामीण भागात तसेच इतर जाती-जमातींमध्ये भाजप इतका मजबूत झाला आहे, त्यामागचं कारण गोपीनाथ मुंडे यांचं नेतृत्व असल्याचं ते सांगतात.भाजपमुळे गोपीनाथ मुंडे नव्हे तर गोपीनाथ मुंडेंमुळे महाराष्ट्रात भाजप आकारास आला, असंही ते सांगतात.

विशेष संपादकीय

विलासराव देशमुखांचे सख्खे मित्र, तर शरद पवारांचे खमके विरोधक

गोपीनाथ मुंडे भाजप नेते असले तरीही विलासराव देशमुखांशी असलेली त्यांची मैत्री जगजाहीर होती. दुसऱ्या बाजूला शरद पवारांना विरोध करण्याचं राजकारण मात्र त्यांनी जोरदारपणे लावून धरलं. एकाच दिवशी वाढदिवस असलेले हे दोन नेते महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर होते.१९९० च्या दशकात महाराष्ट्र भाजपचा चेहरा म्हणून प्रमोद महाजन यांचीच ख्याती होती. मात्र, १९९४-९५ च्या सुमारास जेव्हा गोपीनाथ मुंडे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्यावर हल्लाबोल करण्याची मोहिम उघडली तेव्हाच ते खऱ्या अर्थाने प्रमोद महाजन यांच्या सावलीतून बाहेर पडू शकले.शरद पवार यांचे सत्ताधारी बाकांवर जितके चाहते होते, तितकेच चाहते विरोधकांमध्येही होते, असं म्हटलं जायचं. शिवाय, प्रमोद महाजन आणि शरद पवार यांचे संबंधही चांगले होते. तरीही गोपीनाथ मुंडे यांनी शरद पवारांना लक्ष्य करण्याची मोहिम उघडली होती.शरद पवारांच्या तत्कालीन सरकारविरोधात टीकेची राळ उठवण्यासाठी गोपीनाथ मुंडे यांनी महाराष्ट्रव्यापी संघर्ष यात्रा काढली. त्यांच्या टीकेचा भर सरकारचा कथित भ्रष्टाचार आणि पवारांच्या कथित जमिनीच्या व्यवहारांवर होता.

गोपीनाथ मुंडे, विलासराव देशमुख आणि छगन भुजबळ शरद पवार मुख्यमंत्री असताना गोवारी आदिवासींनी मोर्चा काढला होता, त्यामध्ये १०५ आदिवासी चेंगराचेंगरीत मरण पावले होते. गोपीनाथ मुंडे यांनी तो मुद्दा हातात घेतला. मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटानंतर दाऊद इब्राहिमसोबत शरद पवारांचे संबंध आहेत, असा एक प्रचार त्यांनी केला. खरं तर या दोन्ही मुद्द्यांना थेट शरद पवार जबाबदार नव्हतेच, पण अशी दाऊदशी संबंध असल्याची अफवा पसरवून तशी राळ त्यांनी नक्कीच उठवली आणि शरद पवारांच्या विरोधातलं वातारवण अधिक गडद करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर १९९५ साली जे युतीचं सरकार आलं, त्याला गोपीनाथ मुंडे यांचा हाच प्रचार अधिक कारणीभूत होता.शरद पवारांना गोपीनाथ मुंडे यांनी प्रकर्षाने लक्ष्य का केलं, याविषयी बोलातना महेश वाघमारे आपली आठवण सांगितात.

ते म्हणाले की, यासंदर्भात आम्ही गोपीनाथ मुंडे यांना प्रश्न विचारले की ते सांगायचे, 'आपण मोठ्या माणसाला खेटलो तरच आपल्यालाही तशी उंची गाठता येऊ शकते.' म्हणूनच, त्यांनी पवारांच्या विरोधातलं राजकारण केलं. शरद पवारांच्या सहकार क्षेत्रातल्या प्रभावाला शह देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. शरद पवारांवर दाऊदशी संबंध असल्याचा आरोपही त्यांनी केला. 'कट्टर पवार विरोधक' अशी त्यांची लक्षणीय ओळखच झाली होती.१९९२ साली बाबरी मशिदीच्या पाडावानंतर झालेल्या दंगली आणि हिंदुत्वाच्या देशव्यापी लाटेमुळे भाजपचा जनाधार वाढलेलाच होता. अशातच, याच काळात मुंडेंनी संपूर्ण महाराष्ट्रभर दौरे करुन जमीन कसल्यामुळेच शिवसेना आणि भाजपच्या युतीसाठी १९९५ ची विधानसभा सोपी ठरली होती.याच निवडणुकीत, युतीतील 'मोठा भाऊ' असलेल्या शिवसेनेकडून मनोहर जोशी मुख्यमंत्री तर 'लहान भाऊ' ठरलेल्या भाजपकडून गोपीनाथ मुंडेंना पहिल्यांदा उपमुख्यमंत्रिपद देण्यात आलं होतं.





पान ४ वरून

## अरबी मदरश्यात

ऐवजी मानवतेचा संदेश जाण्यास नक्कीच मदत होईल.

या वेळी शामराव पडुळे यांच्या आनंदात अरबी मदरसा अन्वरुल उलुमचे सर्वेसर्वा मुफ्ती अतिकूर्रहेमान शेख व आझाद हिंद संस्थेचे कामखेडा ता. बीड चे सचिव शेख मुसा यांनी पेढा भरवत आनंद द्विगुणित केला. यावेळी सोबत जेष्ठ नागरिक शेख बाबाभाई,शेख मुजीब,शेख सद्दाम उपस्थित होते. या आनंदमय समई नातवास दीर्घायुष्य -आरोग्य लाभो अशी दुवा -अशिर्वाद देण्यात आले.

## अल्पसंख्यांक विकास

सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी (ठऊ) यांची भेट घेऊन त्यांना अल्पसंख्यांक विकासासंदर्भात विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर केले. यानंतर, त्यांनी अल्पसंख्यांक विभाग अधिकारी आणि मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी मौलाना आझाद आर्थिक विकास मंडळाचे संचालक तय्यब शेख हे देखील उपस्थित होते. या बैठकीत अल्पसंख्यांक समाजासाठी असलेल्या विविध शासकीय योजना, त्या योजनांचा लाभ घेताना येणाऱ्या अडचणी, आणि योजनांच्या अंमलबजावणीतील त्रुटी यांसारख्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अल्पसंख्यांक समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी तसेच त्यांच्या विकासाला गती देण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली. या महत्त्वपूर्ण दौऱ्यामुळे बीड जिल्ह्यातील अल्पसंख्यांक समाजाच्या समस्यांना वाचा फुटण्यास मदत होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

## आ.संदीप क्षीरसागरांनी

२०२३ साली महेदवीया दायरा कब्रस्तान ची पाहणी केली होती. त्यावेळी त्यांनी आश्वासन दिले होते की, लवकरच कब्रस्तानच्या संरक्षक भिंतींचे बांधकाम करून देण्यात येईल. याला आता जवळपास तीन वर्ष होत आले आहेत. तरीही कब्रस्तानच्या संरक्षक भिंती काही बांधून देण्यात आल्या नाहीत. भिंती जमीन दोस्त झाल्याने कब्रस्तानात बेवारस कुत्र्यांचा सुळसुळाट झाला. त्यांनी कब्रस्तानातील कबरींची मोठ्या प्रमाणात नासधूस करून टाकली आहे. यामुळे महेदवीया समाजाकडे जमा असलेल्या निधीतून भिंतींच्या जागेवर पत्र्याचे पार्टिशन बांधून घेण्यात आले आहे. पत्र्याचे पार्टिशन कब्रस्तानच्या संरक्षक भिंत म्हणून बांधण्यात आलेले हे कब्रस्तान बीड शहर व जिल्हाच नाही तर बहुदा संपूर्ण भारतात एकमेव कब्रस्तान असेल असे उद्विग्न मत या अनुषंगाने महेदवीया समाजाचे विश्वस्त तथा मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी मांडले असून जर सामाजिक कामात शासन-प्रशासन व लोकप्रतिनिधी कामी येत नसतील तर त्यांचा उपयोग काय? असा प्रश्नही उपस्थित केला आहे.

पान १ वरून

## लोकनेते मुंडेंच्या

पंकजा मुंडेंची भावनिक साद

भजन कार्यक्रमानंतर उपस्थित मुंडेप्रेमींसमोर बोलताना मंत्री पंकजा मुंडे अत्यंत भावुक झाल्या. लोकनेते गोपीनाथराव मुंडेंवर प्रेम करणाऱ्या जनतेला नतमस्तक होण्यासाठी स्थळाची गरज होती, म्हणून गोपीनाथ गड उभा राहिला. ही निर्मिती माझी नसून जनतेच्या प्रेमाची आहे. त्यांनी पुढे वचन दिले, आमच्या शेवटच्या श्वासापर्यंत आम्ही गोपीनाथगडावर येत राहू. गोपीनाथरावांनी वंचितांसाठी आयुष्य घालवले, त्यांनी उभं केलेलं कार्य अधिक सुदृढ करण्यासाठी ईश्वर आम्हाला बळ देवो, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

शिखरशिंगणापूरची 'संघर्ष ज्योत' दाखल

गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त डॉ. राजेंद्र खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली गेली १२ वर्षे अखंडितपणे काढण्यात येणारी शिखरशिंगणापूर ते परळी वैजनाथ संघर्ष ज्योत सकाळी साडेअकराच्या सुमारास गोपीनाथ गडावर पोहोचली. महादेवाला अभिषेक करून प्रस्थान केलेली ही ज्योत घेऊन आलेल्या कार्यकर्त्यांचे माजी खासदार प्रीतम मुंडे यांनी स्वागत केले. दिवसभर गडावर रक्तदान शिबिर आणि प्रसादाचा कार्यक्रम सुरू होता.

## २०२७ मध्ये

केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत जनगणना करण्याबाबतचा निर्णय झाला आहे. या निर्णयानुसार देशभरात दोन टप्प्यात जनगणना होणार आहे. विशेष म्हणजे या जनगणनेसाठी ११ हजार ७१८ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

केंद्र सरकारच्या निर्णयानुसार, आता २०२७ मध्ये जातनिहाय सविस्तर जनगणना होईल. यानंतर नव्याने मतदारसंघाची बांधणी होईल. या काळात नव्या मतदारसंघांची देखील रचना होईल. त्यामुळे ही जनगणना जास्त महत्त्वाची आहे. या जनगणनेत देशात कोणत्या भागात कोणत्या समाजाचं वास्तव्य आहे, तसेच विविध समाजाची नेमकी काय लोकसंख्या आहे, याची देखील इत्यंभूत माहिती मिळणार आहे. त्यामुळे केंद्र सरकारने आजच्या मंत्रिमंडळात घेतलेला निर्णय हे महत्त्वाचं पाऊल असल्याचं मानलं जात आहे.केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज पत्रकार परिषद घेत याबाबत माहिती दिली. २०२७ ची राष्ट्रीय जनगणना दोन टप्प्यात केली जाईल. पहिला टप्प्यात घरांची यादी आणि घरांची गणना समाविष्ट आहे. हा टप्पा एप्रिल २०२६ ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत पूर्ण केला जाणार आहे. तर दुसरा टप्पा हा फेब्रुवारी २०२७ मध्ये होईल. या टप्पा लोकसंख्या गणनावर केंद्रीत राहील. पण बर्फवृष्टी झालेल्या भागात सप्टेंबर २०२६ मध्ये ती पूर्ण करण्याचा प्रयत्न राहील, अशी महत्त्वाची माहिती अश्विनी वैष्णव यांनी दिली. विशेष म्हणजे ही पहिली डिजीटल जनगणना असेल, अशी महत्त्वाचीदेखील माहिती त्यांनी दिली.

## सहावीत शिकणाऱ्या

सूरजकुमार धोंडीराम खांडे (वय २२, रा. म्हाळसजवळा, ता. बीड) याने जबरदस्ती केल्याचे सांगितले. त्याप्रमाणे अपहरणाच्या गुन्ह्यात पोक्सो आणि ट्रॉसिटीचे कलम वाढवण्यात आले. पोलिसांनी लगेच खांडेला बेड्या ठोकल्या. तो सध्या कारागृहात आहे.

या प्रकरणात आधी अपहरण आणि नंतर पोक्सोसह ट्रॉसिटीचे कलम वाढवण्यात आले. मात्र, मुलीच्या प्रकरणात कोणते कलम वाढले, याचे लेखी पत्र किंवा कागदपत्र मिळावे म्हणून तक्रारदार असलेली पीडितेची आई बुधवार व गुरुवार असे दोन दिवस पोलिस अधीक्षक कार्यालयात आली. बालहक्क कार्यकर्ते तत्त्वशील कांबळे यांच्यासमवेत त्यांनी उपअधीक्षक पवार यांची भेटही घेतली; परंतु त्यांनी लेखी काहीच न देता केवळ तोंडी माहिती दिली, त्यामुळे आईने नाराजी व्यक्त करत घरी परतली. याआधीही शिरूर तालुक्यातील एका साडेसहा वर्षांच्या चिमुकलीवर झालेल्या अत्याचाराच्या प्रकरणात पोलिसांनी पीडितेच्या आईला मदत न केल्याची तक्रार पोलिस अधीक्षकांकडे केलेली आहे; पण त्याची अद्यापही चौकशी झालेली नाही. हे प्रकरण ताजे असतानाच, हा नवा प्रकार उघडकीस आल्याने बीड पोलिसांवर तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

समुपदेशन गरजेचे होते

पीडितेच्या आईसह उपअधीक्षकांची भेट घेतली; परंतु त्यांनी कलम वाढीसह इतर पत्र देता येत नसल्याचे सांगितले. पीडितेला वेळीच समितीसमोर हजर केले असते, तर समुपदेशनाने हा प्रकार टळला असता.

-तत्त्वशील कांबळे, बालहक्क कार्यकर्ते, बीड

## प्रायव्हेट विमानामधील

दाखल झाल्यावर दस्तुरखुद्द चित्रा वाघ यांनी विमानातील आणि विमानाबाहेरील फोटो शेअर केले. त्यावेळी त्यांच्या सोबत भाजपचे माध्यम समन्वयक नवनाथ बनसुद्धा दिसत होते. आता हाच विमान प्रवास भाजप नेत्यांसाठी अडचणींचा ठरला आहे.

चरहरीरीहींर ढळाशीघऊ्वउ झेश्रळींळली: भाजप, शिंदेसेनेची पालिकेसाठी युती, पण 'त्या' नेत्यांची गोची; भाईंच्या होमपीचवर अनेकांची धाकधूक वाढली

एका बाजूला इंडिगो संकटामुळे सर्वसामान्य जनता मेटाकुटीला आलेली असताना भाजप नेत्यांनी केलेला सुखदायी प्रवास चर्चेचा विषय ठरला. यावरुन भाजपच्या केंद्रीय नेत्यांनी विमान प्रवास करणाऱ्या नेत्यांना चांगलंच झापलं आहे. एनडीटीव्ही इंडियानं सुत्रांच्या हवाल्यानं याबद्दलचं वृत्त दिलं आहे. या प्रवासाची दखल थेट दिल्ली भाजपमधील बड्या नेत्यांनी घेतली. भाजपचे केंद्रीय संघटनमंत्री बी. एस. संतोष आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या कार्यालयानं या प्रकरणात लक्ष घातलं. यानंतर संबंधित नेत्यांना कठोर शब्दांत इशारा देण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील चित्रा वाघ आणि प्रसाद लाड यांना सुनावल्याचं एनडीटीव्ही वृत्तात म्हटलं आहे.

गेल्या आठवड्यात देशभरात इंडिगो संकटामुळे हवाई वाहतुकीचा बोजवारा उडाला. पायलट आणि केबिन क्रूसाठी डीजीसीएनं नवे आदेश काढले. त्यानुसार कर्मचाऱ्यांना अधिक विश्रांती देणं गरजेचं झालं. यामुळे इंडिगोला कर्मचाऱ्यांची कमतरता भासू लागली. कंपनीनं अनेक विमानांची उड्डाणं रद्द केली. याचा फटका देशभरातील हजारो कर्मचाऱ्यांना बसला.

## तिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी

भावांना सर्व्हे नंबर ३०/१ आणि ३०/२ मा. दिवाणी न्यायालय क स्तर केज यांचेकडील दिवाणी दावा क्र. ७५/२०२४ मधील अंतिम हुकूमनामा (कोर्ट डिक्री) आधारे वाटुन आलेल्या मिळकतीची महसुल अभिलेख्याला नोंद घेण्यात आली आहे. त्या वाटणीपत्रा आधारे त्यांच्या पाच वारसांना वाटुन आलेल्या मिळकतीचा वाटप तक्ता हा जमिनीची मोजणी करुन तयार करण्याकामी तहसीलदार यांच्या कार्यालयाने दि. १३ मार्च २०२५ रोजी भुमी अभिलेख कार्यालय केज, यांना आदेशीत केले आहे. त्या जमिनीची रीतसर मोजणी करण्यासाठी ८ डिसेंबर २०२५ रोजी मोजणीसाठी तारीख नेमुन देण्यात आली होती.

मोजणी करतेवेळी पोलीस संरक्षण व बंदोबस्त देण्याची विनंती केली होती. परंतु त्या जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्यांनी मोजणी करण्यास मज्जाव केला सदर अतिक्रमण हटवुन त्या मिळकतीची मोजणी करुन अहवाला नुसार चतु:सिमा ठरवुन देण्यात यावी. या मागणीसाठी विष्णू लांडगे यांच्या कुटुंबातील महिला व लहान मुले उपोषणाला बसले आहेत. चार दिवसापासून सुरू असलेल्या उपोषणात तीन महिन्याची गरोदर माता, वृद्ध व्यक्ती आणि लहान मुलांचा समावेश आहे.